
[ बालगीताचा ]

# हुरडा.

११५८
म. ग्रं. सं. ठाणें
षय काव्य
क्र. १५३५



REFBK-0010036
REFBK-0010036

कविः- श्री. 'विष्णुसुत' उंब्रजकर कऱ्हाड.

प्रथमावृत्ती सन १९५८.

किंमतः- ३७ नये पैसे.

[ बालगीतांचा ]

# हुरडा.



REFBK-0010036

कविः- श्री. 'विष्णुसुत' उंब्रजकर कऱ्हाड.

★

किंमतः- ३७ नये पैसे.

प्रकाशक—
रामचंद्र विष्णु कुलकर्णी
ऊर्फ कवि विष्णुसुत उंब्रजकर
कऱ्हाड (जि. सातारा)

—❦❦—

मुद्रक--
रामचंद्र गणेश गिजरे
प्रोप्रायटर:-श्रीगजानन प्रेस
गुरुवारपेठ, कऱ्हाड.

---

टीपः- पृष्ठ १८ मधील आठव्या ओळीबद्दल खालील ओळ वाचावी.

पाखरं हाणूं दुरी।

# कवीचें हृद्गत.

सेवानिवृत्ती नंतर रहिमतपूर येथील प्रॅक्टिसिंग स्कूल व ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिकविण्याची संधि दोन वर्षें मिळाली. त्यावेळीं बाहेरील पद्यांचीं गरज विद्यार्थ्यांना भासूं लागल्याचे कळलें. शिक्षकाच्या नोकरीच्या माझ्या चाळीस वर्षांच्या कालांत, हजारों विद्यार्थी हातांखालून गेल्यामुळें त्यांचे स्वभाव, आवडी–निवडी, गुणदोष, त्यांचें आंवतींभोंवतींचें जग, त्यांचे खेळाचे विषय इत्यादींचें बरेंच जवळून अवलोकन झालें. त्यांतच सेवानिवृत्ती पूर्वींचीं दोन वर्षें इयत्ता १ ली शिकविण्याचा लाभही मला मिळाला. त्यामुळें, सोप्या, गोड व परिचयाच्या चालीवर सुगम कविता लिहिण्याची कल्पना दुणावली.या संग्रहांतील बहुतेक कविता त्या कालांतील म्हणजे सन १९५०।५१ सालांत निर्माण झाल्या आहेत, हें कळून येईल.

वरील बालगीतांचा संग्रह प्रसिद्ध करावा हा हेतु मनाशीं होता. गेल्यावर्षीं माझा मुक्काम पुण्यास ४--५ महिने होता. त्या अवधींत सध्यांचे ट्रेनिंग कॉलेज पुणें येथील प्राचार्य कविवर्य श्री. ग. ह. पाटील यांचा परिचय झाला. व "आपण या संग्रेहास एक छोटेखानी पुरस्कार लिहावा" ही मनीषा मी व्यक्त केली. तेव्हां तत्काल मोठ्या आपुलकीनें व मोकळेपणानें सोबतचा पुरस्कार त्यांनीं लिहून दिला, याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहें.

हा गीतसंग्रह• गु० बा. सा. बुधकर, श्री. म. भि. कुलकर्णी, श्री. पु. पां. गोखले, श्री. बा. वा. घाटे, श्री. गो. ज. फणसळकर, श्री. य. रा. नावडीकर वगैरे कवींनीं व लेखकांनीं नजरेखालीं घालून बहुमोल सहाय्य केलें. याबद्दल व ज्या रसिकवर्यांनीं थोडक्यांत पण योग्य असे अभिप्राय लिहून दिले. त्याबद्दल मी कृतज्ञ आहें.

सुंदर चित्रें काढून दिल्याबद्दल श्री. विभूते, उत्तम व सुबक ब्लॉक करून दिल्याबद्दल श्री देशपांडे, छपाई वगैरेचें उत्कृष्ट काम करून दिल्याबद्दल श्रीगजानन प्रेसचे मालक श्री. रा. ग. गिजरे व त्यांचे सहकारी यांचा मी फार आभारी आहें.

शेवटीं हा ताजा 'हुरडा' इ.१ ते ४ वरील शिक्षक व त्यांतील विद्यार्थी वर्ग यांचे हातीं देत आहें. तो त्यांना आवडेल असा दृढ विश्वास वाटतो.

मि. आषाढ शु. ११<br>शके १८८०

कवि '**विष्णुसुत**' उंब्रजकर,<br>कऱ्हाड.

39534 वि: अ०७
9534 नों: दि: 24/11/4

# पुरस्कार

कवि ' विष्णुसुत ' उंब्रजकर यांनीं मुलांसाठीं लिहिलेल्या आपल्या छोटेखानी कवितासंग्रहाला मी प्रस्तावना लिहावी अशी इच्छा व्यक्त केली. मुलांच्यासाठीं कविता लिहिण्याची व अशा कवितांचा संग्रह करण्याची मला हौस असल्यानें मी त्यांच्या इच्छेस मान्यता दिली.

' विष्णुसुत ' हे हाडाचे शिक्षक आहेत आणि त्यांची सारी हयात प्राथमिक शिक्षकाच्या पेशांत गेली; त्यामुळें त्यांना बालस्वभावाचें व बालप्रवृत्तीचें ज्ञान चांगलें आहे. मुलांना समजतील व रुचतील अशा बऱ्याच कविता त्यांनीं वेळोवेळीं लिहिल्या आणि त्या ' आनंद,' ' बालसन्मित्र, ' ' प्राथमिक-शिक्षण, ' ' शाला-पत्रक ', ' मुलांचें मासिक ' यांतून प्रसिद्धही झाल्या. आतां त्या पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहेत. या कवीचें इतरही काव्यलेखन विपुल आहे.

विष्णुसुतांच्या कवितेचें एकंदर स्वरूप बाळबोध व प्रासादिक आहे; त्यांत लालित्य व कल्पनाविलास कमी पण रचनेची सफाई चांगली. ' मुंगी ', ' ही कुठली आली बाई ' इत्यादि कवितांत कांहीं गमतीदार कल्पना आढळतात. ' अजागळ मधू ' या सारख्या कवितांत थोडा विनोदही आहे. ' शाळवाची मळणी, ' हुरडा, ' ' गाडी निघालि रानांत,' यांत ग्रामीण वातावरण आहे. कवीचें सारें आयुष्य खेड्यांत गेल्यानें ते ग्रामीण जीवनांत चांगले समरस होऊं शकतात. ' मुलांचे खेळ ' ' मुंगी ' या सारख्या कविता थोड्या लांब असल्या तरी मुलांना आवडण्यासारख्या आहेत. अगदीं लहान मुलांसाठीं लिहिलेलीं अशीं बाळगाणीं व अभिनयगीतें यांत नाहींत. 'मुलांचे खेळ' यासारखें एखादें अभिनयगीत म्हणतां येईल.

मुलांसाठीं चांगल्या कवितांचे संग्रह फार थोडे आहेत; हल्लींचे नामांकित कवि तर या क्षेत्राकडे ढुंकूनही पहात नाहींत. पूर्वीं रे० टिळक, बालकवि, तांबे, दत्त यांनीं इतर काव्याबरोबर उत्कृष्ट बालगीतेंही लिहिलीं; तशीं गीतें आजच्या नव्या पिढींतील ख्यातनाम कवि लिहीत नाहींत ही खेदाची गोष्ट आहे. अशा परिस्थितींत ' विष्णुसुत ' उंब्रजकरासारख्या शिक्षकी पेशांतील कवीनें दिलेली ही ' हुरड्याची मेजवानी ' गुळमाट आहे यांत शंका नाहीं.

पुणें, ता० २७-६-५८

ग. ह. पाटील,
प्राचार्य
ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन् पुणें.

———

# अनुक्रमणिका.


| अ.नं. | कवितेचें नांव | प्रसिद्धि स्थळ व काळ | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | ही कुठली आली बाई ... | 'आनंद' मार्च १९३१ | १ |
| २ | मुलांचीहीं मुळिं बाबा नव्हेत खेळणीं | 'मुलांचें मासिक' फेब्रुवारी–१९५४ | २ |
| ३ | भाकरीचा खेळ ... ... | 'शालापत्रक' नोव्हेंबर–१९३४ | ३ |
| ४ | अजागळ मधु .... ... | 'बालसन्मित्र' डिसेंबर–१९५३ | ४ |
| ५ | खोड मोडली खाशी ... | 'बालसन्मित्र' जानेवारी १९५१ | ५ |
| ६ | शिस्त ... ... ... | 'बालसन्मित्र' एप्रिल १९५१ | ६ |
| ७ | आली दिपवाळी ... ... | 'जीवन शिक्षण' आक्टोबर–१९५७ | ७ |
| ८ | मुलांचे खेळ ... ... | 'आनंद' एप्रिल १९५० | ८ |
| ९ | ही अमुची काळी कपिला ... | 'आनंद' मार्च १९३१ | ११ |
| १० | केवढी मुंगो गमते मनीं ... | — — — | १३ |
| ११ | कंपोस्ट खत ... ... | 'करमणुकींतून शिक्षण'–जानेवारी १९५७ | १५ |
| १२ | गाडी निघालि रानांत ... | 'बालसन्मित्र' फेब्रुवारी–१९५२ | १६ |
| १३ | हुरडा ... ... ... | 'बालसन्मित्र' सप्टेंबर–१९५० | १७ |
| १४ | शाळवाची मळणी ... ... | 'प्राथमिक शिक्षण' एप्रिल–१९५१ | १९ |
| १५ | करुण दृश्य ... ... | 'बालसन्मित्र' एप्रिल १९५४ | २१ |
| १६ | अंगबळापेक्षां अकलेचें बळ अधिक | 'मराठी शिक्षक' आक्टोबर–१९१९ | २२ |
| १७ | सद्गुण महिमा ... ... | — — — | २४ |

# “ ही कुठली आली बाई ”



चालः—( वधू ही वल्ली० )

अग ए ताई । ही कुठली आली बाई ॥ ध्रु० ॥

हात उचलितां हात उचलिते ।
वांकुन बघतां वांकुन बघते ।
खालीं बसतां जवळी बसते ।
कोण ही बाई । वेडावी मजला ताई ॥ १ ॥

दिव्याजवळ मी येउं लागलें ।
दूर भिंतिशीं ती परी पळे ।
तिच्या जवळ जातांच ती वळें ।
बिलगली ताई । ही कोण असावी बाई ॥ २ ॥

१००३६

क्षणांत मुलगी दिसे धाकुटी ।
पुन्हां केवढी भासे मोठी ।
फिरुनी माझ्या दिसे एवढी ।
कशी ही बाई । क्षणिं लहान मोठीं होई ॥ ३ ॥

हसलें कितीदां मी ओरडलें ।
परि ती एक न अक्षर बोले ।
तोंड मात्र भेसूर दाविलें ।
भयंकर ताई । दावी ही भीती बाई ॥ ४ ॥

केव्हां केव्हां पुढें चालते ।
केव्हां मागें खूप राहते ।
केव्हां संगें चिकटुन फिरते ।
अगदीं बाई । पिच्छा ही सोडित नाहीं ॥ ५ ॥

हेळगांव ता. कऱ्हाड १९३१

---

## " मुलांचीं हीं मुळिं बाबा नव्हेत खेळणीं "

चालः— (बाळ जातो दूर देशा०)

नको नको सुईदोरा घेऊस हातांत ।
शिवण्याचा छंद नको बोचेल बोटांत ॥ १ ॥

पेरू कांपण्याला चाकू हळूंच तूं घेशी ।
कांपतांना परी बाळा कांपील बोटासी ॥ २ ॥

कातरण्यासाठीं हवी कातरि कशाला ।
कातरीतां कागदाला कातरि बोटाला ॥ ३ ॥

टांचणीचा हट्ट नको धरूस तूं बाळा ।
बोचतांच झणी रक्त निघेल बोटाला ॥ ४ ॥

आडकित्ता डब्यांतिल हातांत घेशील ।
बोट सांपडून रक्तबंबाळ होशील ॥ ५ ॥

घेवोनिया दौत टांक लिहाया बैसशी ।
भरतिल बोटें शाई लागून अंगाशीं ॥ ६ ॥

*      *      *      *

आडकित्ता, सुई, चाकु, कातरि, टांचणी ।
" मुलांचीं हीं मुळिं बाबा नव्हेत खेळणीं ! "

कऱ्हाड ता० ९-८-५०

---

## भाकरीचा खेळ

चालः-(वधू ही वल्ली०)

नदीवर वाळू । ' भाकरी खेळ चल खेळूं ' ॥ ध्रु० ॥

चपतोळसे दगड घेउनी ।
कीं कौलाची फिरकी करुनी ।
किंवा पातळ शिंपा अणुनी ।
हुडकुनि वाळू । ' भाकरी खेळ चल खेळूं ' ॥ १ ॥

किती फेकतां क्षणीं बुडाले ।
मधेंच जाउनि कितीक दडले ।
पहा तरंगत कांहिं चालले ।
पुन्हां भिरकावूं । ' भाकरी खेळ चल खेळूं ' ॥ २ ॥

लाटा वाटोळ्या बघ उठती ।
एका पुढती अनेक दिसती ।
जणूं भाकरी कुणी फेकिती ।
गंमत पाहूं । ‘ भाकरी खेळ चल खेळूं ’ ॥ ३ ॥

मंद्रूळ हवेली ता. ६–९–१९३३.

---

## अजागळ मधु !

चाल– ( गंगा यमुना डोळयांत उभ्या कां० )

अजागळा रे ! दारांत उभा कां ? ।
जा घरीं जा अला तसा तूं निघूनि जा ॥ ध्रु ॥
मारिल्या ओरडुनि हांका किति तुज जवळीं ।
हूं कां चूं न मुळीं ।
ताई हालवुनी दमली । माई ही शिणली ।
तव गुरुजी हे तुला सांगती जा ॥ जा घरीं जा० ॥ १ ॥
घेवोनी कांठी बाबा येती वरती ।
अन् चादर काढुनि फेकियली भूवरतीं ।
आणि मारिली थप्पड त्यांनीं या गालावरती ।
रूप दर्पणीं पहा जाउनी जा । जा घरीं जा० ॥ २ ॥
हें नाक तोंड तव भरलेलें बरबटलें ।
बघ कपडे कसले बसले मळकट हे असले ।
घरीं जाउनी धू पाण्यानें मुख हें बुरसटलें ।
घालुनि ये पोषाख स्वच्छ तूं जा । जा घरीं जा०॥३॥

कराड ता. ३१।७।१९५०

# " खोड मोडली खाशी "



चालः—( भूपती खरे हे )

खाऊनि भाकरी दुधांत कुसकरलेली ।
जाहला आडवा टिप्या बैठकी जवळीं॥ १ ॥
घे मिटुनी डोळे पाय पसरुनी पुढती ।
झोंपला वाटलें खराच जमिनीवरती ॥ २ ॥
आईनें मजला दूध न देतां प्याया ।
घातलें टिप्याला खुशाल आतां खाया ॥ ३ ॥
अंतरीं तेधवा राग मधूला आला ।
लपवुनी आणिली काठी मारायाला ॥ ४ ॥
पाठींत टिप्याच्या हळुंच हाणुनी त्यानें ।
अन् पळूं लागला तसाच आनंदानें ॥ ५ ॥
गुरकावुनि उठुनी टिप्या धावला मागें ।
पायाचा लचका धरला जाउनि वेगें ॥ ६ ॥
काढुनी सूर मग मधू रडे त्या सरसीं ।
तों वदे कुणीसें " खोड मोडली खाशी " ॥ ७ ॥

कऱ्हाड २१-८-१९५०

# शिस्त

—*—

चालः—(आनंदी आनंद गडे०)

ओळीनें जाऊं सदनीं । शिस्तीनें शाळेमधुनी ॥ध्रु०॥

पिशवींत पाटी घालोनी । काखोटीला ती धरुनी ॥
छत्री हातीं घेवोनी । तयार व्हावें सर्वांनीं ॥
घणघण घंटा ।
वाजे आतां ।
पांच वाजतां ।
सूचनाच ही ये कळुनी । घरीं जावया सकलांनीं ॥ १ ॥

आपण शाळेंतील मुलें । शिस्त आपणां मुळिं न कळे ॥
पहा कसे सगळे जमले । एकच ही गर्दी उसळे ॥
दारा जवळी ।
ढकला ढकली ।
चाले अपुली ।
रीत न बरवी जाणोनी । आपण देऊं टाकोनी ॥ २ ॥

मुंगी प्राणी किति सान । दिसतो परि सद्गुण खाण ॥
शिस्तीचें त्यांना ज्ञान । गडबड करिती मुळींच न ॥
एक निघाली ।
मागुनि आली ।
सर्व मंडळी ।
ओळीनें जाती निघुनी । आपण तर त्याहुनि ज्ञानी ॥३॥

कऱ्हाड ता० ३१-७-१९५०

# " आली दिपवाळी "

चालः-- ( किरकिरती रातकिडे० )

दसऱ्याची सोन्याची गंमत ती सरली ।
आतां ही सुखवाया आली दिपवाळी ॥ ध्रु० ॥

तूप, रवा, गूळ, पिठी, साखर नी तेल ।
बाजारांतुनि बाबा आणुनि देतील ।
लागतील कामाला आई अन् सगळीं ॥ आतां० ॥ १ ॥

घमघमाट सुटला हा गर्दी तळण्याची ।
इकडेही किति घाई लाडू वळण्याची ।
'हें नाहीं तें आणा' तारांबळ सगळी ॥ आतां० ॥ २ ॥

बिजलीचा चकचकाट होई घरिंदारीं ।
त्यांतच त्या पणत्यांचा तोराही भारी ।
किति दाटी दीपांची शोभे आभाळीं ॥ आतां० ॥ ३ ॥

तेलें अन् उटणीं ही लावुनि अंगाला ।
गडबड किति स्नानाची होइ पहाटेला ।
चंद्रज्योति, फुलबाजे उडविति त्या वेळीं ॥आतां०॥४॥

थाट फराळाचा मग होइ सकाळाला ।
वाढियलें आईनें पोटभरी सकलां ।
लाडु कुणी कानवला मागे कुणि चकली ॥ आतां०॥५॥

घालोनी रांगोळी पानें मांडियलीं ।
वाढियलीं पक्वान्नें पंगत मग बसली ।
आग्रह पाहूनि माझी मुरकुंडिच वळली ॥आतां०॥६॥
मान दिवाळींत खरा भाऊबीजेला ।
प्रेमें मी ओवाळी आपुल्या दादाला ।
ओवाळणि पाहुनि तर माझी काळि खुलली ॥आतां०॥७॥

कऱ्हाड ता० ९।१०।१९५०

## मुलांचे खेळ

चालः- ( झिम्मा खेळूं य० )

जाऊं या चला । जाऊं या चला ।
एके ठायीं खेळति बाळें पाहूं या चला ॥ ध्रु० ॥



सावकार पुत्र बडा ।
टेके दगडाच्या लोडा ।
'पैसे व्याजाचे ते काढा' बोले कुळाला ॥ एके ठायीं० ॥१॥
भटजीचे मूल आलें ।
लव्हाळ्याचे दर्भ केले ।
'श्राद्ध करूं चल म्हणे तुझ्या घराला' ॥एके ठायीं० ॥२॥

बसे मास्तराचें पोर ।

पाषाणाच्या खुर्चीवर ।

म्हणे ‘ पुढें हात कर छडी घेण्याला ’ ।। एके ठायीं० ।। ३ ।।




पाटलाचा लेक बांका ।

बोले ‘ गाढवाच्या लेका ।

दूर घोडा दिसेना कां ? साहेब आला ’ ।। एके ठायीं० ।।४।।



बॅग पट्टा टाक कानीं ।

बने पोष्टमन कोणी ।

‘ हें घ्या पत्र ’ जाई झणीं दुज्या घराला ।। एके ठायीं० ।।५।।

बने स्टेशनमास्तर ।
'घ्या हीं तिकीटें लौकर'।
घंटा झाली, गर्दी फार, हलवी कंदीला ॥ एके ठायीं० ॥६॥
लांब दोऱ्याचें तें टोंक ।
लावोनिया कानां एक ।
'टेलिफोन आला देख' म्हणे मुलाला ॥ एके ठायीं० ॥७॥
कोणी गवई-कुमार ।
मारीतसे ताना फार ।
हातवारे अनिवार गंधर्व झाला ॥ एके ठायीं० ॥८॥
दोघा पालथें घालून ।
तबुला डग्गा वाजवून ।
पटका डोईचा फेकून गुंगूं लागला ॥ एके ठायीं० ॥ ९ ॥



शेतकरी-लेक कोणी ।
बैल मोटेला जुंपूनी ।
'ओ हो ! पवळ्या' म्हणे पाणी पाजूं उंसाला ॥
॥ एके ठायीं ॥१०॥

३१५३८ वि: ३।७।५१
९५३८ नों: दि: २४।७।५१

गुराख्याचें पोर होई ।
हातीं काठी पाते डोई ।
'हैक हैक म्हणे गाई चल रानाला' ॥ एके ठायीं० ॥११॥

मारवाड्याच्या लेंको आमी ।
अमच्या बाकी द्यावा तूमी ।
'वीशन् तीनो त्रेचालीशो ईशाब ज्याला' ॥ एके ठायीं० ॥१२

भिकाऱ्याचें पोर गुणी ।
टोपी उताणी धरोनी ।
'अण्णासाब भिक्शा कोणी वाडा मजला' ॥ एके ठायीं० ॥१३।

चाफळ ता० पाटण ता. १-१०-३६

---

## " ही अमुची काळी कपिला "



१००३६

चालः-(वधू ही वली०)

॥ पूज्य आम्हांला । 'ही अमुची काळी कपिला' ॥ ध्रु० ॥

उठुनि सकाळीं शेण काढुनी ।
झाडुनि गोठा स्वच्छ करोनी ।
आणुं तियेला पाजुनि पाणी ।
मग मी त्यांला । घालितसें चारा ओला ॥ १ ॥

दादा दिसतां दारावरती ।
गाय वासरें हंबरताती ।
हात फिरवितां पाठीवरतीं ।
भाव भुकेला । प्रेमाचा दाविति सकलां ॥ २ ॥

कासंडीमधिं घेउनि पाणी ।
दादा येतां धारेलागुनि ।
कान तदा बघती टवकारुनि ।
सुचविति त्याला । लागली भूक बाळाला ॥ ३ ॥

दावें सोडायास जातसे ।
ओढ वासरूं किती घेतसें ।
गुळकी फुटतां पळत सुटतसें ।
मारि ढुशीला । करितसें अमृत–पानाला ॥४॥

धार संपतां गडबड उसळे ।
घेउनि पेले जमलीं बाळें ।
दूध घेउनी प्याले सगळे ।
परत घराला । जाती मग हुदडायाला ॥ ५ ॥

गोठा नच हा भासे मंदिर ।
गाय वासरूं त्यांतिल ईश्वर ।
सेवनिं त्यांच्या आम्ही तत्पर ।
अम्हां गो-पाला । कमती मग काय सुखाला ? ॥ ६ ॥

कामधेनु ही गाय भूतलां ।
सुधा मधुर धारोष्ण पयाला – ।
देई आम्हां नित पानाला ।
अमर आम्हांला । कां बनविल नच तें बोला ? ॥ ७ ॥

कऱ्हाड ता० २७–९–५०

# " केवढी मुंगी गमते मनीं "

चाल- ( धरूं नका हीं वरें० )

लहान असुनी जनीं । ' केवढी मुंगी गमते मनीं ' ॥ ध्रु० ॥

हां हां म्हणतां झाल्या गोळा ।
निरोप यांना कुणी कळविला ।
काय निघाल्या बाजाराला ।
गोकुळच्या गौळणी । ' केवढी मुंगी गमते मनीं ' ॥ १ ॥

जत्रा कोठें काय निघाली ।
कीं लग्नाची गर्दी जमली ।
किंवा मोठी सभा चालली ।
एकात्रित होउनी । ' केवढी मुंगी गमते मनीं ' ॥ २ ॥

दंगा धोपा कांहीं नाहीं ।
ओळीनें बघ जाती सर्वहि ।
आगगाडिचा रूळच पाही ।
येथें अणिला कुणीं । ' केवढी मुंगी गमते मनीं ' ॥ ३ ॥

आळस यांना नाहीं माहित ।
प्रयत्न यांचे अखंड चालत ।
करी जरी नर करणी निश्चित ।
नारायण हो जनीं । ' केवढी मुंगी गमते मनीं ' ॥ ४ ॥

खाद्य असो तें अवजड कितिही ।
ओढुनि ढकलुनि नेती सर्वहि ।
प्रयत्नास त्या गणती नाहीं ।
नवलाचि वाटे मनीं । 'केवढी मुंगी गमते मनीं ' ॥ ५ ॥

कणकण माती गोळा करुनी ।
बांधियलें बघ वारुळ यांनीं ।
यत्नाची ही शिकस्त बघुनी ।
यत्नेश्वर जणुं गुणी । 'केवढी मुंगी गमते मनीं ' ॥ ६ ॥

बीळ बघोनी असें आयतें ।
नाग येउनी राही तेथें ।
न कळे परि तो केव्हां उलटे ।
जातीवर जाउनी । 'केवढी मुंगी गमते मनीं ' ॥ ७ ॥

कृतघ्न ऐशा नागा बघुनी ।
अगणित मुंग्या क्षणांत जमुनी ।
चाविति कडकड फोड फोडुनी ।
टाकिति त्या मारुनी । 'केवढी मुंगी गमते मनीं ' ॥८॥

दुरभिमान तो पुरा सोडतां ।
मुंगी होउन साखर खातां ।
कार्य होतसें बघतां बघतां ।
अनुभव ये निशिदिनीं । 'केवढी मुंगी गमते मनीं ' ॥९॥

कराड ता. २०।१०।५०

---

# " कंपोस्ट खत "

चालः—( वधू ही वल्ली० )

अल्प कष्टावें । कंपोस्ट खता बनवावें ॥ ध्रु० ॥

उंचवट्याची जागा निवडा ।
पश्चिम बाजू त्यांतिल सोडा ।
तीन फुटावर खोल न काढा ।
असें स्थल घ्यावें । कंपोस्ट खता बनवावें ॥ १ ॥

सहा दहा नी तीन फुटांचीं ।
मापें घ्यावीं हीं खड्ड्याचीं ।
कीं ही वेदी खत-यज्ञाची ।
हवन करावें । कंपोस्ट खता बनवावें ॥ २ ॥


तळ भूमी ही सपाट लागत ।
उष्ण मान ही ठेवी नियमित ।
कृमिवर्धन मग होई संतत ।
लक्ष पुरवावें । कंपोस्ट खता बनवावें ॥ ३ ॥

भोंवतिंचा वा अवारांतला ।
पाला पाचोळा तो सगळा ।
करुनी गोळा आणुनि घाला ।
अन्न करवावें । कंपोस्ट खता बनवावें ॥ ४ ॥

पुरती अल्पश्रम कार्याला ।
खर्च पदरचा नलगे याला ।
धंदा बरवा हा गरिबाला
तरी व्रत घ्यावें । कंपोस्ट खता बनवावें ॥ ५ ॥

रहिमतपूर ता० २२-२-५६

# " गाडी निघालि रानांत "



चाल :— ( ओवी सारखी )

( १ )

' गाडी निघालि रानांत ' । अवजारें सर्व त्यांत ।
नांगरट शिवारांत । पैरेकऱ्यासमवेत ॥

( २ )

' गाडी निघालि रानांत ' । कुरकुल शोभे आंत ।
खाल निघे मिरवीत । घेई धरित्री पोटांत ॥

( ३ )

' गाडी निघालि रानांत ' । आंत वियाणीं नी औत ।
पेर-घात साधितात । मृताची ना तदां खंत ॥

( ४ )

' गाडी निघालि रानांत ' । कूपकांटी बंदोबस्त ।
भांगलण कोळपण । गर्दी तमाम चालत ॥

( ५ )

' गाडी निघालि रानांत ' । काढणीची फार मात ।
चाले मळणी खळ्यांत । मोतीं भरून आणीत ॥

कऱ्हाड ता० ४-२-५१

# " हुरडा "




चालः— ( चला सुट्टी झाली )

चला बिगी बिगी । हुरडा खायाला शेतांत जाऊं ।।ध्रु०।।

पखुळा बाळा जुंपून ।
आला गाडी घेऊन ।
बघ वाढूळ बसलाया भाऊ। चला बिगी बिगी० ।। १ ।।

वांग घेतलंय भाजून
दहीं लोटकं भरून ।
चटणी पुडींत घालून घेऊं । चला बिगी बिगी०।। २ ।।

शेंगा गूळ पाही ।
खजूर गुळ्‌माट्‌ लई ।
नारळ्‌ फोडून समद्यांना देऊं । चला बिगी बिगी० ॥३॥

हुरडा कोळा जरी ।
खाऊं प्वाट भरी ।
मग डरारा ढेकार देऊं । चला बिगी बिगी०॥ ४ ॥

बसुं माळ्यावरी ।
खाउं प्वाटभरी ।
अशी मजेंत गोफण फिरवूं ।चला बिगी बिगी० ॥ ५ ॥

कऱ्हाड ता. २६-७-५०



शेंगा गूळ पाही ।
खजूर गुळमाटू लई ।
नारळ फोडून समद्यांना देऊं । चला बिगी बिगी० ॥३॥


हुरडा कोळा जरी ।
खाऊं प्याट भरी ।
मग डरारा ढेकार देऊं । चला बिगी बिगी० ॥ ४ ॥

बसुं माळ्यावरी ।
खाउं प्याटभरी ।
अशी मजेंत गोफण फिरवूं । चला बिगी बिगी० ॥ ५ ॥

कऱ्हाड ता. २६-७-५०



# -: शाळवाची मळणी :-



चाल :-- ( भला जन्म हा तुला० )

( १ )

माघ संपला फाल्गुन आला दाणा ही करडला ।
मळणिचा मोसम सुरुं जाहला ॥
'भलरि दादा भलगाडि दादा' शब्द शिवारांतला ।
दुमदुमे सांज सकाळीं भला ॥
उभ्या पिकाला क्षणांत गाडि हा निजवितसे भूतलां ।
पिकाशीं जणुं झोंबूं लागला ॥
चालली काढणीची ही घाई अशी ।
उसळली खळें करण्याची गर्दी तशी ।
घेऊन घागरी जल शिंपिति झटादिशीं ।
तिवडा रोवुनि बैल जुंपुनी खळें खुरटुं लागला ।
खळें मग तयार हो मळणिला ॥

(२)

बोलावुनि त्या आया बाया खुडणी सुरुं जाहली ।
शेजऱ्यामधिं कणसें टाकिलीं ॥
खळ्याभोंवतीं गोल तराळीं पेंढ्यांची बांधिली ।
शेजऱ्यांतिल कणसें ओढिली ॥
शिरवळ पडतां बैल जुंपुनी पात सुरूं जाहली ।
भुकेची शुद्ध न त्या राहिली ॥
घेउनी जरासा डुलका मध्यान्हिला ।
अन् भल्या पहाटे उठुनि गडी चालला ।
कडपिच्या झपाझप पेंढ्या बघ बांधिल्या ।
पाचुंद्यांची ओळ सरळ ती पाहुनि संतोषला ।
न्यारिला वक्तत जरी जाहला ॥

(३)

ऐन उन्हाची तिरिप संपुनी दिवस कलूं लागला ।
सुटतसे वारा मग चांगला ॥
उपण्या देई एक, वाढवी वावडिवरुनी दुजा; ।
हातणी मारि तिजा राशिला ॥
अल्प काळ लोटतां खळ्यामधिं ढीग दिसूं लागला ।
धरणिनें मोतिच कीं पिकविला ॥
मोजुनी भराभर पोतीं भरती कुणी ।
बलुत्यांना बलुतें पोटभरी देउनी ।
धान्याच्या गाड्या निघति घरालागुनी ।
हौशा, पवळ्या नांव घेउनी गीत गाउं लागला ।
असा हा बळिराजा शोभला ॥

ड ता० १९-३-५०

31535 वि:
9530 नों: दि:
दा. क. 10036

# " करुण दृश्य "



( वृत्त = दिंडी )

शीण आलेला जरा जावयाला ।
सहज झालों आडवा बैठकीला ।
कुठें डोळ्याला लागतो न डोळा ।
तोंच चिमण्यांनीं चिवचिवाट केला ॥ १ ॥

क्षणीं ऐशी मम झोपमोड झाली ।
मनीं धिंगाणा कोप तदां घाली ।
सजे काठी घेऊन हुसकण्याला ।
दिसे तेव्हां बहु ' करुण दृश्य ' डोळा ॥ २ ॥


चिमूताईचें नव-प्रसव बाल ।
पडे कोठ्यांतुनि भूमिवरी खोल ।
मार बसतां क्षणिं होय घालमील ।
माय भगिनी तैं मिळति दयाशील ॥ ३ ॥

*　　　　*　　　　*

परी त्याची तत्काळ विझे ज्योत ।
आणि कोलाहल बहुत काळ होत ।

कऱ्हाड ता० २८।३।१९५३

# " अंगबलापेक्षां अकलच बल अधिक "



चालः-- ( वृत्त :- गीति )


अंगानें पुष्ट असा मंदरगिरिकुहरिं एक सिंह वसे ।
योगक्षेम तयाचा पशु संहारावरी सदैव असे ॥ १ ॥
गर्वें तेणें केला बहु पशु संहार हें जया कालीं ।
कळलें सकळ पशूंतें जमले लवलाहिं ते तशा कालीं ॥२॥
बसले एकें ठायीं ठराव केला पसार एक मतें ।
दररोज पाठवावें एकेका त्याकडे नव्या पशुतें ॥३॥
लाजे काजें दिधली सिंहानें मान्यता ठरावास ।
पाळी येतां पशुनीं एके दिनिं धाडिलें शृगालास ॥४॥
पेटे अग्नी एका किंचितशा तैल बिंदुनें जैसा ।
केला अवेळ यास्तव खवळे तो जंबुकावरी तैसा ॥५॥

३९८३ ९५३८ वि: २५/११/५ नों: दि:

क्षात्र गुणातें ठेवी अंतरिं, वाग्यांग गालित दावितसे ।
भीतिभरें मद्भाषण परिसा ऐसें शृगाल सांगतसे ॥ ६ ॥
असतां येत गुरुकडे सिंह तदां भेटला दुजा मार्गीं ।
अडवुनि मासि तो बोले जासि कुठें त्वरित सांग मजलागीं॥७
करि मी बहु विनती कीं, नामें दुर्दांत सिंह मत्स्वामी ।
जात असें मी तिकडे सोडा सत्वर अनाथ पामर मी ॥८॥
लेखिति मातें पशुपति जाणति पशु मजसि सर्व सिंहपती ।
ऐसें असतां सकलहि कां त्या अधमाधमाकडे जाती ॥९॥
चेवें केसरि तेणें तो होई मम छळासि उद्युक्त ।
परि परिखुनि मी येतो हें देउनि वचन जाहलों मुक्त ॥१०
बलवत्तर मी मोठा ऐसा अभिमान ज्या असे हरि तो ।
दुर्दांत वदे ' मातें सत्वरिं त्या दावि प्राणधन हरितो '॥११
लवलाहिं उठुनि चाले जंबुक, दुर्दांत मागुनी जाई ।
वापी सन्निध नेउनि सांगे 'प्रति सिंह अंतरीं पाही ' ॥१२॥
अज्ञत्वें डोकावी, गर्जे पसरीहि स्वमुख दुर्दांत ।
कूपांतुनिही तत्सम प्रतिक्रिया होतसे फसे त्यांत ॥१३॥
धिक् स्वजिणें त्या वाटे म्हणुनी दुर्दांत क्रुद्धतर झाला ।
अविचारें उडि घाली तेणें तत्प्राणही लया गेला ॥१४॥
करि पशुताप निवारण यास्तव पशु वानिती शृगालासी ।
अकलेचेंच अधिक बल अंगबलापरिस दावि सकलासी॥१५॥

उंब्रज ता. कऱ्हाड ता. २८-९-१९

## " अंगबलापेक्षां अकलच बल अधिक "



चालः-- ( वृत्त :- गीति )

अंगानें पुष्ट असा मंदरगिरिकुहरिं एक सिंह वसे ।
योगक्षेम तयाचा पशु संहारावरी सदैव असे ॥ १ ॥
गर्वें तेणें केला बहु पशु संहार हें जया कालीं ।
कळलें सकल पशूंतें जमले लवलाहिं ते तशा कालीं ॥२॥
बसले एकें ठायीं ठराव केला पसार एक मतें ।
दररोज पाठवावें एकेका त्याकडे नव्या पशुतें ॥३॥
लाजे काजें दिधली सिंहानें मान्यता ठरावास ।
पाळी येतां पशुनीं एके दिनिं धाडिलें शृगालास ॥४॥
पेटे अग्नी एका किंचितशा तैल बिंदुनें जैसा ।
केला अवेळ यास्तव खवळे तो जंबुकावरी तैसा ॥५॥

३१५३ ९५३० वि: आव २५/११/५ नों: दि:

क्षात्र गुणातें ठेवी अंतरिं, बाह्यांग गलित दावितसे ।
भीतिभरें मद्भाषण परिसा ऐसें शृगाल सांगतसे ॥ ६ ॥

असतां येत गुरुकडे सिंह तदां भेटला दुजा मार्गीं ।
अडवुनि मासि तो बोले जासि कुठें त्वरित सांग मजलागीं॥७

करि मी बहु विनती कीं, नामें दुर्दांत सिंह मत्स्वामी ।
जात असें मी तिकडे सोडा सत्वर अनाथ पामर मी ॥८॥

लेखिति मातें पशुपति जाणति पशु मजासि सर्व सिंहपती ।
ऐसें असतां सकलहि कां त्या अधमाधमाकडे जाती ॥९॥

चेवें केसरि तेणें तो होई मम छळासि उद्युक्त ।
परि परतुनि मी येतो हें देउनि वचन जाहलों मुक्त ॥१०

बलवत्तर मी मोठा ऐसा अभिमान ज्या असे हरि तो ।
दुर्दांत वदे 'मातें सत्वरिं त्या दावि प्राणधन हरितो'॥११

लवलाहिं उठुनि चाले जंबुक, दुर्दांत मागुनी जाई ।
वापी सन्निध नेउनि सांगे 'प्रति सिंह अंतरीं पाही' ॥१२॥

अवत्वें डोकावी, गर्जे पसरीहि स्वमुख दुर्दांत ।
कूपांतुनिही तत्सम प्रतिक्रिया होतसे फसे त्यांत ॥१३॥

धिक् स्वजिणें त्या वाटे म्हणुनी दुर्दांत क्रुद्धतर झाला ।
अविचारें उडि घाली तेणें तत्प्राणही लया गेला ॥१४॥

करि पशुताप निवारण यास्तव पशु वानिती शृगालासी ।
अकलेचेंच अधिक बल अंगबलापरिस दावि सकलासी॥१५॥

उंब्रज ता. कऱ्हाड ता. २८-९-१९

# सद्गुण-महिमा

( वृत्त - भुजंगप्रयात )

मुखानें सदा सत्यवाचा वदावी ।
सचोटीच अंतीं यशोमार्ग दावी ।
कसाही जरी घोर आला प्रसंग ।
न होवो परी अल्पही सत्यभंग ॥१॥
असे सत्यवादी ' हरिश्चंद्र ' भूप ।
तया जाचिलें गाधिजेंही अमूप ।
परी सांडिलें नाहि सत्यव्रताला ।
पहा पोचला तो यशोमंदिराला ॥२॥
कदां ना चुको वागणें वक्तशीर ।
[illegible] शिस्तिनें होतसें सौख्य थोर ।
[illegible]यामुळें वाचतो वेळ फार ।
[illegible]ार्यही होत आटोपशीर ॥३॥
[illegible] राहती मुंबई माजि लोक ।
वसे श्रेष्ठ न्यायी तिथें ' मंडलीक ' ।
असे कीर्ति त्याची बहू वक्तशीर ।
चुके एक सेकंदही तो न थोर ॥४॥
सदा स्पष्टवक्तेपणानें वदावें ।
पुढें एक मागें दुजें हें न व्हावें ।
असे ' रामशास्त्री ' जरी आश्रयास ।
तरी सांगि देहांत शिक्षा धन्यास ॥५॥



REFBK-0010036
90036
37535
9536 नों दि. 24/8/64

# कांहीं अभिप्राय

## श्री. कमल बहुलेकर, बी. ए. बी. टी.

प्राचार्य, कमला नेहरू अध्यापिका विद्यामंदिर कराड.

" काव्यसंग्रहाबद्दल धन्यवाद ! "

माझे व्यवसायबंधु श्री. कवि 'विष्णुसुत' यांनीं लिहिलेला 'हुरडा' हा काव्यसंग्रह मीं अगत्यपूर्वक वाचला; लहान बालकांना काव्यक्षेत्रांत अगदीं सुलभरीतीनें नेण्याचें अवघड कार्य त्यांनीं या पुस्तकद्वारें केलें आहे.

त्यांतील विषय एक ते चार इयत्तांतील मुलांच्या मानसशास्त्रीय सहजप्रवृत्तीला अनुसरूनच आहेत. जीवन-शिक्षण-तत्त्व-प्रणालीनुसार कृतिद्वारा शिक्षण, मुलांचे खेळ, शालेय जीवनांतील शिस्तीबद्दल प्रेम, सांस्कृतिक कार्यक्रमांत उपयोगी पडणारें अभिनयगीत व ग्रामीण जीवनाबद्दल आत्मीयता निर्माण करणारीं 'हुरडा' 'मळणी' सारखीं काव्यें सहज सुलभ आहेत. प्राथमिक शिक्षकांना पुरवणी वाचनासाठीं अतिशय उपयुक्त असा हा काव्यसंग्रह आहे. ता. २ जुलै १९५८.

—०—

## श्री. द. पां. पाठक—सेवानिवृत्त मुख्याध्यापक

टिळक हायस्कूल व कन्याशाळा, कऱ्हाड.

लहान मुलांना शाळतील क्रमिक पुस्तकांबाहेरील गाणीं म्हणावयाची आवड नेहमीं दिसून येते. कांहीं तरी अर्थशून्य पण तालबद्ध गाण्याच्या ओळी गातांना तीं आढळतात. कवि 'विष्णुसुत' यांच्या या गीत-संग्रहामुळें मुलांच्या तोंडीं दैनंदिन जीवनांतील वास्तववादी प्रसंग ठेवयांत ऐकावयास मिळतील. गाणीं अगदीं बाळबोध व रसाळ असून तीं तालांत म्हटलीं असतां, मनरंजन करणारीं आहेत; 'मुलांचे-खेळ' 'हुरडा' इत्यादि गाणीं तीं तीं दृश्यें पुढें उभीं करतात. ता. ५-७-'५८

—×—

## श्री. बनूबाई हवलदार सेवानिवृत्त

असि. डे. एज्यु. इन्स्पेक्ट्रेस उ. सातारा.

मुलांना क्रमिक पुस्तकांतील गाणीं कमी पडतात व त्यामुळें तीं बाहेरील गाण्यांचीं पुस्तकें शोधतात. श्री. 'विष्णुसुत' उंब्रजकर यांनीं 'हुरडा' हें बालगीतांचें पुस्तक तयार केलें आहे; त्यांत मुलांच्या आवडीचीं व परिचयाचीं गाणीं आहेत; हीं गाणीं लहान मुलांना फार आवडतील व त्यांच्या मनाचें रंजन करतील, तरी अशीं सुलभ गाण्यांचीं पुस्तकें शाळेंतील पुस्तक-संग्रहालयांत ठेवण्यास उपयुक्त आहेत. ता. ७-७-५८.

## सद्गुण-महिमा

( वृत्त - भुजंगप्रयात )

मुखानें सदा सत्यवाचा वदावी ।
सचोटीच अंतीं यशोमार्ग दावी ।
कसाही जरी घोर आला प्रसंग ।
न होवो परी अल्पही सत्यभंग ॥१॥
असे सत्यवादी ' हरिश्चंद्र ' भूप ।
तया जाचिलें गाधिजेंही अमूप ।
परी सांडिलें नाहि सत्यव्रताला ।
पहा पोचला तो यशोमंदिराला ॥२॥
कदां ना चुको वागणें वक्तशीर ।
[illegible] शिस्तिनें होतसें सौख्य थोर ।
[illegible]त्यामुळें वाचतो वेळ फार ।
[illegible]कार्यही होत आटोपशीर ॥३॥
[illegible] राहती मुंबई माजि लोक ।
वसे श्रेष्ठ न्यायी तिथें ' मंडलीक ' ।
असे कीर्ति त्याची बहू वक्तशीर ।
चुके एक सेकंदही तो न थोर ॥४॥
सदा स्पष्टवक्तेपणानें वदावें ।
पुढें एक मागें दुजें हें न व्हावें ।
असे ' रामशास्त्री ' जरी आश्रयास ।
तरी सांगि देहांत शिक्षा धन्यास ॥५॥

REFBK-0010036
REFBK-0010036
90036
वें ता. कऱ्हाड ता. २-३-१९२७
37535
9536
नों दि.

# कवि विष्णुसुतांचें प्रसिद्ध वाङ्मय.

(१) 'विष्णुसुतांची कविता किमत १ रु.

(२) हुरडा ( बालगीतसंग्रह ) किमत ३७ नये पैसे

# पुढील प्रकाशनें.

(१) मुलांचा राष्ट्रीय मित्र ( बोधपर कविता )

(२) समर्थ-चरित्र ( कीर्तनमाला )

(३) मुलांचा एकनाथ ( बालबोध चरित्र )

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें-

(१) श्री. रामचंद्र विष्णु कुलकर्णी उर्फ कवि विष्णुसुत उंब्रजकर, सोमवार २४८ कऱ्हाड ( जि. सातारा )

(२) प्रसिद्ध बुकसेलर्स, पुणें.